साप्रवि/गट-८(स्वक्र)/सा.आ.११७/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला, धारावी रोड
माटुंगा, मुंबई - ४०००१९.

# सुधारपत्र क्र.३३ दिनांक ७.१०.२००४

(सर्वसाधारण आदेश क्र.११७ (क) दि.३१.३.१९८६ करिता)

विषय : म.रा.वि.मंडळाच्या कर्मचा-यांना दि.१.१.२००२ ते ३१.७.२००३ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या फरकाची रक्कम अदा करण्याबाबत.

वाचा : सुधारपत्र क्र.३१ दिनांक १७.९.०३ व सुधारपत्र क्र.३२ दि.२९.६.०४.

''''''''

महाराष्ट्र शासनाने वित्त विभाग निर्णय क्रमांक ममवा-११०२/प्र.क्र.२२/सेवा/९ दि.१४.८.२००३ अन्वये शासनाच्या सर्व कर्मचा-यांना दिनांक १.८.२००३ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ४४.५० % ऐवजी ५५ % या सुधारित दराने महागाई भत्ता लागू केला होता. त्यास अनुसरुन मंडळाने त्यांच्या कर्मचा-यांसाठी सदर सुधारित दराने महागाई भत्त्याचे प्रदान सर्वसाधारण आदेश क्र.११७ (क) दिनांक ३१.३.८६ ला संलग्न सुधारपत्र क्रमांक ३१ दि.१७.९.२००३ अन्वये करण्यात आले आहे.

२. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने निर्णय क्र.वित्त विभाग ११०२-प्र.क्र.२२/सेवा-९ दि.१६.१०.२००३ अन्वये शासनाच्या सर्व कर्मचा-यांना दि.१.१.२००२ ते दि.३१.७.२००३ या कालावधीसाठी खालीलप्रमाणे सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला आहे.

| अ.क्र. | महागाई भत्ता अनुज्ञेय होण्याचा दिनांक | दरमहा महागाई भत्त्याचा दर (टक्के) | |
|---|---|---|---|
| | | विद्यमान | सुधारित |
| १. | १.१.२००२ | ४१.५ | ४३.५ |
| २. | १.४.२००२ | ४४.५. | ४६.२५ |
| ३. | १.७.२००२ | ४४.५ | ४८.५ |
| ४. | १.१.२००३ | ४४.५ | ५०.७५ |
| ५. | १.४.२००३ | ४४.५ | ५५ |

३. शासनाच्या धर्तीवर दि.१.१.२००२ ते ३१.७.२००३ या कालावधीतील वरीलप्रमाणे सुधारित महागाई भत्ता मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या विचाराधीन होता. शासनाच्या धर्तीवर मंडळ कर्मचा-यांना महागाई भत्ता मंजूर करण्यासंदर्भात मंडळाने निर्णय क्र.८५८ दि.१५.१.२००१ अन्वये सचिव, तांत्रिक सदस्य (नि.), तांत्रिक सदस्य (पा.व वि.) व लेखा सदस्य यांचेशी विचारविनिमय करुन निर्णय घेण्यासाठी मा.अध्यक्ष यांना अधिकार प्रदान केले आहेत. आता महाराष्ट्र वीज नियामक मंडळाने त्यांच्या अंतरिम आदेश क्र.MERC/Case No.63 of 2003/1777 दि.२२.९.२००४ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार व अध्यक्षांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार त्यांनी सचिव, तांत्रिक सदस्य (नि.) व लेखा सदस्य यांच्याशी विचारविनिमय करुन मंडळ कर्मचा-यांना दि.१.१.२००२ ते दि.३१.७.२००३ या कालावधीच्या वरीलप्रमाणे सुधारित महागाई भत्त्यास मंजूरी दिली आहे व या सुधारित महागाई भत्त्याच्या १९ महिन्याचा फरक खालील प्रमाणे अदा करण्याचा निर्णय घेतला आहे.

अ) दिनांक १.१.२००२ ते ३१.१२.२००२ (१२ महिने) करिता फरकाच्या रकमेचे प्रदान माहे नोव्हेंबर २००४ च्या पहिल्या आठवडयात करण्यात यावे.

ब) उर्वरित दिनांक १.१.२००३ ते ३१.७.२००३ (७ महिने) करिता फरकाची रक्कम माहे जानेवारी २००५ च्या पहिल्या आठवडयात अदा करण्यात यावी.

४. संबंधित अधिका-यांना या अनुषंगाने असे निर्देश देण्यात येत आहेत की उपरोक्त प्रमाणे सुधारित महागाई भत्त्याच्या फरकाची रक्कम अदा करण्यासाठी आवश्यक निधीची मागणी त्यांनी श्री.व्ही.आर.शिरसकर, सह मुख्य लेखाधिकारी (अर्थोपाय विभाग), हॉंगकॉंग बॅंक बिल्डिंग, ४ था मजला, मुंबई ४०००२३ यांचेकडे त्वरित नोंदवावी.

(संजय भाटिया)
सचिव

प्रत :
प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाच्या अधिका-यापर्यंत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.